# व्यवस्थापन
# [Management]

**Shivaji Dattatraya Thore**
Ph.D., M.Phil., M.Com., M.A.(Eco),M.A.(Pol), M.A.(Mar).,G.D.C. & A., B.Ed.(Gen),B.Ed.(Phy),
Arts, Science &Commerce Collage, Manmad Dist-Nashik (M.S)
Head-Dept. of Commerce, Guide-Savitribai Phule Pune University [Business Administration& Business Practices]

## 1.प्रस्तावना (Introduction)

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत, तंत्रज्ञानाच्या युगाने औद्योगिक क्रांती घडवून आणली. तंत्रज्ञान, माहिती, वाहतूक, संगणक, शिक्षण, उद्योजकता, व्यापार, व्यवसाय, आयात-निर्यात, इतर सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ विकास व वृध्दी होत आहे. यातून रोजगार निर्मिती होऊन बेकारी दूर होत आहे. आर्थिक प्राप्ती होऊन गरज पूर्ण करून व्यक्ती व समाज भविष्यकाळासाठी बचत करत आहे. असे सुयोग्य चक्र अर्थव्यवस्थेत सध्या दिसून येत आहे. असे सर्व योग्य असले तरी मानवी शरीरात जसे शरीर अवयवापैकी मेंदू महत्त्वाचा आहे. त्याच पद्धतीने व्यवसायात व्यवस्थापनाला उच्च स्थान आहे.

माणसाचा मेंदू ज्याप्रमाणे शरीराचे पूर्ण नियंत्रण करतो त्याप्रमाणे व्यवसायाचे व्यवस्थापन पूर्ण नियंत्रण करीत असते. मेंदू शिवाय शरीराला अर्थ नाही. तसेच व्यवस्थापनाशिवाय व्यवसायाला अर्थ नाही. यावरून असे निर्दशनास येते की, व्यक्तीने व्यवसाय करत असताना त्या व्यवसायात व्यवस्थापन अतिशय महत्वाचे आहे. व्यवस्थापनामुळे आपण करीत असलेला व्यवसायाची भविष्यकालीन वाटचाल योग्य होऊन आपण समाजाला चांगली सेवा देऊ शकतो.

किम्बॉल आणि किम्बॉल च्या मते "व्यवसायाची वाढ , अर्थ पुरवठा, मुख्य धोरणाची आखणी, आवश्यक त्या साधनाची व्यवस्था, व्यवसाय कार्य ज्या अंतर्गत चालणार त्या संघटनेचे सामान्य स्वरूप निश्चित करणे आणि प्रमुख अधिकाऱ्यांची निवड सर्वांशी असलेल्या कर्तव्याचा व कार्याचा समावेश व्यवस्थापनात होतो." व्यवसायात प्रत्येकाला आपल्या सवयीनुसार काम करण्यासाठी मोकळीक दिल्यास कोणताही गोंधळ होत नाही. कामात गती, शिस्त, नियमित व नियंत्रित काम राहण्यासाठी नियंत्रणाची गरज असते. व्यवसाय चांगल्या पद्धतीने होण्यासाठी व्यवसायापुढे विशिष्ट उद्दिष्ट असावे लागते आणि ते साध्य करण्यासाठी निर्देशन व नियंत्रणाची गरज असते. जॉन मी च्या मते, "व्यवस्थापन ही एक कला आहे. मालक व कामगार यांना महत्तम समृद्धी आणि सूख तसेच जनतेला उत्कृष्ट सेवा मिळवून देण्याच्या उद्देशाने कमीत-कमी प्रयत्नांमधून जास्तीत-जास्त निष्पत्ती मिळून घेण्याच्या कलेला व्यवस्थापन असे म्हणतात. डॉ. ए.एम. डोके च्या मते,"नियोजन, नियंत्रण, समन्वय यामध्ये समानता साधून व्यवसायाला चांगला फायदा मिळवून देणे म्हणजे व्यवस्थापन होय." यावरून असे स्पष्ट होते की, व्यवस्थापन व्यवसायाला चांगली ऊर्जा देते त्यामुळे व्यवसाय स्पर्धेच्या युगात चांगली सेवा देऊन कायम स्वरूपी टिकून राहू शकतो ही किमया व्यवस्थापनाची आहे हे सिद्ध होते.

## 2. उद्देश (objectives)

1. व्यवस्थापन अर्थचा अभ्यास करणे.

2. व्यवस्थापन व्याख्याचा अभ्यास करणे.

3.व्यवस्थापन अभ्यासाची आवश्यकता /गरज अभ्यासणे.

4. व्यवस्थापनाची प्रक्रिया अभ्यासणे.

5. व्यवस्थापनाची कार्ये अभ्यासणे.

## 3. गृहितके (Hypothesis)

1. व्यवस्थापन अर्थ याबाबत अभ्यास करीत आहे

2.व्यवस्थापन व्याख्याचा अभ्यास करीत आहे.

3.व्यवस्थापन अभ्यासाची गरज बाबत अभ्यास करीत आहे.

4. व्यवस्थापनाची प्रक्रिया बाबत अभ्यास करीत आहे.

5.व्यवस्थापनाची कार्ये याबाबत अभ्यास करीत आहे.

## 4. व्यवस्थापन: अर्थ

(Meaning of Management)

तंत्रज्ञानाचे युग असले तरी सुद्धा व्यवसायिक संस्थेचे ध्येय व उद्देश साध्य करण्यासाठी मनुष्य आणि साधनसामग्रीची आवश्यकता/गरज असते. या सर्व उपलब्धतेची योग्य प्रकारे, उपयोग/वापर करणे याला 'व्यवस्थापन' म्हटले जाते. व्यवस्थापन ही व्यापक प्रक्रिया असून त्यामध्ये व्यवसायाशी संबंधित व्यवस्थापकीय कार्याचा प्रामुख्याने विचार केला जातो. संघटन, नियोजन, नियंत्रण, समन्वय आणि मार्गदर्शन ही व्यवस्थापनाची कार्ये आहेत.

कर्मचारी समाजशील घटक असून तो समूहात राहून काम करणे त्याला आवडते. त्यामुळे तो सामाजिक घटकांच्या परस्पर सहकार्याने सामंजस्य व समन्वयाने व्यक्ती आपली उद्दिष्टे परिणामकारक व यशस्वीपणे पूर्ण करतो यात शंकाच नाही.

**5. व्यवस्थापन- व्याख्या:-**

(Definition of management)

"व्यवस्थापन" बाबत अनेक विचारवंत व शास्त्रज्ञांनी आपले मत संकल्पनांमध्ये मांडलेली आहेत. त्यातील ठळक विचार पुढीलप्रमाणे:-

**<u>हेन</u>**<u>री फेयॉल च्या मते-</u>

"व्यवसायातील घडामोडींचा अंदाज घेणे, कार्याचे नियोजन व संघटन करणे, सर्व कार्यामध्ये समन्वय साधणे आणि कार्यावर नियंत्रण ठेवणे म्हणजे व्यवस्थापन करणे होय."

हेनरी फेयॉल यांचा जन्म फ्रान्समध्ये सन 1841 मध्ये झाला. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी सन 1860 मध्ये त्यांने इंजिनिअरिंगची पदवी संपादन केली .सन 1872 मध्ये खाणीच्या एका विभागात व्यवस्थापक झाल्यावर त्यांने खाणीचे अर्थिक आयुष्य ठरवण्याच्या प्रश्नांवर सखोल अभ्यास केला.

**<u>एफ. डब्ल्यू. टेलर च्या मते:-</u>**

"व्यवस्थापन हे तुम्हास कोणते काम करावयाचे आहे आणि ते काम अधिक चांगल्या प्रकारे व कमीत कमी खर्चात कसे होईल हे जाणून घेण्याची कला आहे."

डॉ. टेलर यांचा जन्म 20 मार्च 1856 रोजी अमेरिकेत झाला. वयाच्या अठराव्या वर्षी टेलर यांनी ॲप्रेन्टीस व टर्नर म्हणून फिलाडेल्फियामधील कॅम्प शिपयार्ड या कंपनीत नोकरीस प्रारंभ केला. व्यवस्थापन शास्त्राच्या विकास प्रक्रियेत टेलर यांनी केलेले कार्य ऐतिहासिक आहे.

### 6. व्यवस्थापन अभ्यासाची गरज

(Need for management study)




वरील सर्व मुद्द्याचा विचार केला तर असे निदर्शनास येते की ,व्यवस्थापनाचा अभ्यास करणे स्पर्धेच्या व तंत्रज्ञानाच्या युगात महत्त्वाची बाब आहे. कोणताही व्यवसायाच्या उत्पादनात वाढ करणे हा व्यवसायाचा प्रमुख उद्देश असतो. उत्पादनात वाढ करण्यासाठी व्यवस्थापनाची गरज असते. कारण व्यवस्थापनामुळे कच्च्या मालाची खरेदी किंमत वाहतूक हे खर्च कमी करता येतात व उत्पादन यामुळे वाढवता येते. ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडींनुसार बाजारपेठेत सतत नवीन बदल आणि स्पर्धेत यांनी वापरले नवीन तंत्रज्ञान यांचा सतत व्यवस्थापनाला अभ्यास करावा लागतो. तसे बदल आपल्या व्यवसायात करावे लागतात. उदा., दूरदर्शन,

टेलिफोन, रेडिओ, प्रसारमाध्यमे इत्यादी प्रत्येक व्यवसायात व्यवसायाची पूर्वनियोजित उद्दिष्टे निश्चित केली जातात, ती पूर्ण करण्याची जबाबदारी ही व्यवस्थापनावर असते. बाजारपेठेत झालेले तांत्रिक व वैज्ञानिक विकास यावर व्यवस्थापनाला सतत लक्ष ठेवावे लागते. नाहीतर व्यवसायाला बाजारपेठेतून बाहेर जावे लागते. उदा., एच. एम. टी., घड्याळ, रेडिओ, कोडाक कंपनी इत्यादी.

व्यवसायात कर्मचाऱ्यांचा सहभाग असणे गरजेचे असते. कारण कर्मचाऱ्यांवर व्यवसायाचे यश अवलंबून असते. व्यवस्थापनामुळे बाजारपेठेत असलेल्या तीव्र स्पर्धेवर नियंत्रण ठेवता येते. कारण आजचा ग्राहक हा जागरूक आहे. त्याला वस्तूची तुलना सहज करता येते.

महात्मा गांधी यांनी ग्राहकांना देव मानले आहे. त्यांच्या मते, व्यवसायाचे यश हे ग्राहकांवर अवलंबून आहे. म्हणून व्यवसायाने बाजारपेठेच्या स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर चांगल्या व्यवस्थापनाबरोबर वस्तू कडे लक्ष दिले पाहिजे. व्यवस्थापनामुळे व्यवसायाच्या उत्पादनात सातत्य ठेवता येते. उदा., वस्तूची चव ,आकार ,रंग, वजन, किंमत, डिझाईन इत्यादी. गोष्टीवर व्यवस्थापनातून लक्ष ठेवता येते कोणत्याही व्यवसायात चांगले व्यवस्थापन असेल तर तो व्यवसाय यशस्वी होण्यास व स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यास चांगलीच मदत होते. म्हणून व्यवसायात व्यवस्थापन अभ्यासाची नितांत गरज आहे. यातून सदैव संशोधन चालू असते भविष्यात होणारे नवीन बदल स्वीकारणे सहज शक्य होते.

**7. व्यवस्थापनाची प्रक्रिया :-**

(Process of management)




व्यवस्थापन प्रक्रियेमुळे व्यवस्थापनाची कार्य विशिष्ट क्रमाने व वेळेत पूर्ण केली जातात. व्यवस्थापक जी कार्य क्रमाक्रमाने करतो. त्यांना व्यवस्थापन प्रक्रिया असे म्हणतात. उदा., क्रिकेटचा सामना चालू असताना

कॅप्टनला सर्व टीमचे नेतृत्व करून व्यवस्थापन करावे लागते. तसेच व्यवसायात चांगले नेतृत्व असेल तर व्यवसाय यशस्वी होण्यास मदत होते.

**8. व्यवस्थापनाची कार्य:-**

(Functions of management)

हेनरी फेयॉल,कुन्टझ व ओडोनल आणि लुथर गुलक यांनी यांच्या अभ्यास व संशोधनानुसार व्यवस्थापनाची कार्य सांगितलेली आहे.

औद्योगिक क्रांतीनंतर व्यवसायात आमूलाग्र बदल झाले. त्यामुळे खरेदीदार व विक्रेते यांच्यामुळे तीव्र स्पर्धा निर्माण झाली. हळूहळू उत्पादन, विक्री, खरेदी, जाहिरात, दळणवळण, संदेशवहन ,संग्रहन ही कार्य वेगळी झाली. त्यामुळे व्यवसायात व्यवस्थापकाची गरज निर्माण झाली. बाजारपेठेचे स्वरूप आंतरराष्ट्रीय बनल्यामुळे बाजारपेठेतील स्पर्धा तीव्र झाल्यामुळे कामगार समस्या, नवीन उत्पादन पद्धतीचा शोध व तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे व्यवस्थापन कार्य व्यवसायाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे बनले यात शंका नाही.

**9. समारोप: -[Conclusion]**

स्पर्धेच्या युगात यशस्वी होऊन चांगली सेवा ग्राहकांना देण्यासाठी व्यवसायात नियोजन करणे अतिशय गरजेचे आहे .व्यवस्थापन ही व्यापक संकल्पना असून कोणताही व्यवसाय चालवणे हे जबाबदारीचे कार्य आहे. व्यवस्थापनाचे महत्त्व आणि गरज विचारात घेत असताना सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक उद्दिष्ट विचारात घ्यावे लागतात ते फार महत्त्वाचे आहे.

व्यवसाय चालवण्यासाठी स्थिर घटकांपेक्षा गतिमान घटक महत्त्वाचे आहे क्रिकेट टीमचा कर्णधार हा प्रेरणादायी असेल तर पराभूत होणारा संघ विजयी होतो आणि कर्णधार प्रेरणादायी नसेल, आदर्श निर्माण करणारा नसेल तर विजय होणार संघ पराभूत होतो.

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील उपलब्ध संसाधनांवर अवलंबून असतो. उपलब्ध संसाधनांचा योग्य पद्धतीने उपयोग करून देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न आणि उत्पन्न वाढविण्याचे कार्य व्यवस्थापन करते.

उत्तम व्यवस्थापन ही व्यवसाय यशस्वी होण्याची गुरुकिल्ली आहे. व्यवस्थापनामुळे व्यवसायाची उद्दिष्टे यशस्वी व परिपूर्ण होतात. दर्जेदार मालाचे उत्पादन होऊन तोमाल निर्यात होतो. खर्च कमी येतो. वस्तू माफक किंमतीत ग्राहकांना उपलब्ध करून देता येते. परकीय चलन उपलब्ध होऊन देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. देशात शांतता नांदते ही किमया व्यवस्थापनाची आहे यात शंका नाही.

**10. संदर्भग्रंथ:-[bibliography]**

1. व्यवस्थापनाची मुलतत्वे लेखक. डॉ. गंगाधर वि. कायंदे- पाटील चैतन्य पब्लिकेशन्स नासिक-13

2. व्यवसाय व्यवस्थापन लेखक. डॉ.पराग काळकर डॉ. अजिनाथ मारुती डोके निराली प्रकाशन पुणे 411005

3. Management: Theory and Practice, J.M.Chandwad

4. Business Organisation and Management, Dr.Y.K.Bhushan

5. Principle of Management, Reddy Tata

6. Principle and Practice of Management L.M.Prasad:S.C.Chand

7. व्यवसाय व्यवस्थापन प्रा. सुरेश भिरुड, प्रा. भास्कर नाफडे. निराली प्रकाशन, पुणे

8. व्यवसाय व्यवस्थापन प्रा. पंतोजी शेळके डॉ. अजिनाथ ढोके